Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आपटकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 |
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्त्वाचे / तात्काळ

क्र.रा.मं./परीक्षा-७/706
पुणे ४११ ००४.
दिनांक-18/02/2025

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- फेब्रुवारी – मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत.

संदर्भ :- १. क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचे पत्र क्र.क्रीयुसे/प्रेसगुण/ऑन अर्ज/२०२४-२५/का-४/३८९४, दि.१४ जानेवारी २०२५.
२. या कार्यालयाचे पत्र क्र.रामं./परीक्षा-७/५१०, दि.०६/०२/२०२५.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय क्र.२च्या पत्रान्वये फेब्रुवारी – मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून क्रीडा प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने दि.१५/०८/२०२५ पर्यंत स्विकारण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थी/शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे ऑनलाईन पध्दतीने अर्ज / प्रस्ताव सादर करण्यासाठी ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यानुसार आपले सरकार या पोर्टलवर URL: https://applesarkar.mahaonline.gov.in या लिंकद्वारे विद्यार्थी/शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे पाठवावयाचे आहेत. विद्यार्थी/शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी या सोबत ऑनलाईन प्रणालीचे User Manual या सोबत जोडले आहे. पोर्टलवर अर्ज भरताना अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी पोर्टलवरील Toll Free क्रमांकावर संपर्क साधावा व क्रीडा गुण प्रस्ताव सादर करणेसंदर्भात काही अडचण आल्यास संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

शाळांनी/कनिष्ट महाविद्यालयांनी क्रीडा प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे ऑनलाईन सादर करत असताना सर्वसाधारण खेळाडू विद्यार्थ्यांच्या संदर्भात या सोबतचे प्रपत्र क्र. १ विभागीय मंडळांनी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडून भरुन घ्यावे. सदरचे प्रपत्र व प्रती विद्यार्थी रु.२५/-(रु. पंचवीस फक्त) प्रमाणे छाननी शुल्क प्रवेशासह विभागीय मंडळाच्या चलनाने, Online अथवा रोखीने भरणा करण्याबाबत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करावे. सदर बाब आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, यांना तसेच सर्व संबंधित घटकांना लिखित स्वरुपात अवगत करुन देण्याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४

क्र.मुंविमं/उमाप/ 0827
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक-25/02/2025

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त माध्य. व उच्च माध्य. शाळा व कनिष्ट महाविद्यालये,
मुंबई /बृहन्मुंबई / ठाणे / पालघर /रायगड जिल्हे.

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी आपल्या स्तरावर नोंद घेऊन सर्व पात्र खेळाडू विद्यार्थ्यांना लिखित स्वरुपात अवगत करावे. तसेच योग्य ती कार्यवाही करावी

(ज्योत्स्ना रवींद्र पवार)
प्र. विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३

प्रत माहितीस्तव सादर -
१. मा.सचिव, राज्यमंडळ, पुणे
२. मा.शिक्षण उपसंचालक, मुंबई.
३. शिक्षणाधिकारी (माध्य.) मुंबई / ठाणे /रायगड .
४. शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई विभाग (पश्चिम/दक्षिण/उत्तर).
५. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय जव्हार/डहाणू/शहापूर/पेण/पालघर.

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीसाठी :-
१. मुंबई /बृहन्मुंबई / ठाणे / पालघर /रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी

Scanned with OKEN Scanner